# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/03/2024 (सोमवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दि. ०३/०३/२०२४ रोजी चे १४.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, मानेगाव टि पॉईंट हायवे रोड सावनेर येथे पिकअप वाहन क्र. एम. एच.–४०/बी जी– ९६८१ मध्ये अवैध्यरित्या जनावरांची वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्टाफ यांनी नाकाबंदी करून पिकअप वाहन क्र. MH40 BG 9681 हीला थांबवुन चेक केले असता सदर पिकअप मध्ये ५ गोवंशिय जनावरे (गोऱ्हे) अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून ५ गोवंश (गोरे) किंमती ५२०००/– रु. व पिकअप क्र. MH 40 BG 9681 किंमती ४०००००/– रु. असा एकुण ४५२०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन **आरोपी चालक १) आरोपी पंकज रामरतन कुमरे, वय २६ वर्ष, रा. बुधला ता. कळमेश्वर जि. नागपुर २) मालक नामे– शाम अशोकराव आत्राम** यांचेविरूद्ध कलम ११(१) (ड)( घ), (च) प्रा. छळ प्रति. अधि. १९६० सहकलम ५ अ (१), ९ महा. प्रा. सं. अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सहायक फौजदार संजय शिंदे, पोलीस हवालदार मोरेश्वर नागोसे, चालक राजू कडु यांनी केली.



## सावनेर परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या ०३ पिडीत महिलांची सुटका करुन आरोपीतांना केले अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील टाकळी भन्साळी येथील विराट फॉर्म हाऊसवर मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास आणुन वेश्याव्यवसाय सुरु आहे. अशी गुप्त बातमीदाराकडुन माहीती दिनांक ०४/०३/२०२४ रोजी रात्री ००.३० वा. मिळाल्यावरून पोलीस स्टेशन सावनेर येथील महिला सहायक पोलीस निरीक्षक मोकाशे व स्टॉफ सह विराट फॉर्म हाऊस येथे जाऊन रेड केली असता विराट फॉर्म हाऊसचा मालक **आरोपी नामे— १) विनय भगवानप्रसाद तिवारी यांनी त्याचा भाऊ २) विवेक भगवानप्रसाद तिवारी याचे सोबत संगनमत करून पिडीत ०३ महीला यांना पैशाचे आमीष दाखवुन वेश्याव्यवसाय करण्यास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विराट फॉर्म हाऊस येथे बोलावून फॉर्म हाऊस मधील रुम कुंटणखाना म्हणून वापरण्यास हेतुपुरस्सर परवानगी देवुन पिडीत महिलांना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले व आरोपी ३) अभिषेक पापु कनोजिया वय २६ वर्ष ४) संतोष वसंता फुले वय २१ वर्ष ५) आदित्य अनिल इंगळे वय २२ वर्ष ६) आयुष दिनेश शेळके वय २२ वर्ष ७) शुभम केवलसिंग मुछावड वय २३ वर्ष सर्व रा. दुर्गामाता मंदीर चौक सदर छावणी नागपुर** यांनी अनैतिक संबंध प्रस्थापित करून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास प्राप्त केले असुन आरोपी कडुन व पिडीत महीला यांचे कडुन मोबाईल एकुण १० किंमती २,९९,०००/— रु. मोटर सायकल २ किंमती १,५५,०००/— व साहीत्य असा एकुण ४,५४,०३०/— रु. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे आरोपी विरुध्द कलम ३७०, ३४ भादवी सहकलम ३(२), (ए), ५(ए), (सी), (डी) पिटा ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अप्पर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, महिला सहायक पोलीस निरीक्षक मोकासे, पोलीस हवालदार राजेश हावरे, कोडनकर, रविंद्र चटप, मानीक शेरे, अशोक निस्ताने, पोलीस अंमलदार अंकुश मुळे, सतिश देवकते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर